# 2018-2019

3.6.1 – Number of extension and outreach programmes conducted in collaboration with industry, community and Non- Government Organisations through NSS/NCC/Red cross/Youth Red Cross (YRC) etc., during the year

| Title of the activities | Organising unit/agency/ collaborating agency | Number of teachers participated in such activities | Number of students participated in such activities |
|---|---|---|---|
| Gram Swachhata Abhiyan | NSS unit of Degree College of Physical Education, Shree H. V. P. Mandal, Amravati. | 7 | 50 |
| District Hospital Swachhata Abhiyan | NSS unit of Degree College of Physical Education, Shree H. V. P. Mandal, Amravati. | 12 | 150 |
| Blood Donation Camp | NSS and NCC unit of Degree College of Physical Education, Shree H. V. P. Mandal, Amravati and Punjabrao Deshmukh Medical College(PDMC) | 47 | 175 |
| Dengue Awareness Rally | NSS unit of Degree College of Physical Education, Shree H. V. P. Mandal, Muncipal Corporation Amravati and Vidarbha Ayurvedic Mahavidyalaya | 54 | 750 |
| Tree Plantation | NSS and NCC unit of Degree College of Physical Education, Shree H. V. P. Mandal, Amravati. | 30 | 255 |
| Blood Checking Camp | Baheti Hospital, Amravati and NSS | 25 | 245 |

| | | | |
|---|---|---|---|
| | unit of Degree College of Physical Education, Shree H. V. P. Mandal, Amravati. | | |
| Blood Donation Camp in memory of Martyrs | NSS and NCC unit of Degree College of Physical Educations NSS Group and Hindi Mahasangh | 10 | 25 |
| Participation in State Level Disaster managment Camp | NSS unit of Degree College of Physical Education, Dr. Babasaheb Ambedkar Marathawada University, Aurangabad. | 0 | 2 |
| Satya Mev Jaytae Water Cup Competition | NSS unit of Degree College of Physical Education, Shree H. V. P. Mandal, Amravati and Pani Foundation and Revenue Department of Pimpalgaon Banai. | 5 | 80 |
| Participation Disaster Management Camp | NSS unit of Degree College of Physical Education and Sant Gadge Baba Amravati University, Amravati. | 2 | 2 |

**जिल्हास्तरीय रा.से.यो. शिबीरामध्ये सहभाग**

दि. १७ ते २४ डिसेंबर २०१८ या कालावधीत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती च्या वतीन वैराग्यमुती संत गाडगेबाबा यांचे जन्मस्थान श्री क्षेत्र शेडगाव, ता. अंजनगाव सुर्जी येथे स्वच्छ भारत व स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत अमरावती जिल्हास्तरीय शिबीरामध्ये महाविद्यालयीन दोन स्वयंसेवक सुमीत घरडे व वित्रक मोरे यांनी यशस्वी सहभाग दर्शवला.

**जिल्हा सामान्य रुग्णालय व न्यु आझाद गणेशोत्सव मंडळ परिसरात स्वच्छता अभियान**





दि. २४ सप्टेंबर २०१८ रोजी सकाळी ८ ते ११ दरम्यान डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्यूकेशन राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे १५० स्वयंसेवकांनी जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती व न्यू आझाद गणेशोत्सव मंडळ. इर्विन चौक परिसरात साफ-सफाई करून स्वच्छता अभियान राबवले. यामध्ये जिल्हा सामान्य रुग्णालयाचे शल्य चिकित्सक डॉ. श्याम सुंदर निकम व न्यू आझाद गणेशोत्सव मंडळ, इचिन चौक येथील अध्यक्ष श्री. दिनेशभाऊ खुब व श्री. गणेश शर्मा महाविद्यालयाचे प्रा. डॉ. संजय तिरथकर. रा.से.या. कार्यक्रम अधिकारी प्रा. मनाज तायडे, प्रा. आशिष हटेकर व प्रा. प्रतिक कोडे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. त्याकरीता जिल्हा सामान्य रुग्णालयाचे कर्मचारी श्री. गजानन खंडारे व मंडळाचे कार्यकर्ते यांचे मालाचे सहकार्य लाभले. स्वच्छता अभियानाकरीता मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देवनाथ, प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांचे मार्गदर्शन लाभले.

**स्व. अंबादासपंत वैद्य स्मृती रक्तदान शिबीरामध्ये सहभाग**



दि. ७ सप्टेंबर २०१८ रोजी श्री. ह. व्या. प्र. मंडळाचे आद्य संस्थापक गुरुवयं स्व. अवादासपंत वैद्य स्मृती दिना निमित्य मंडळाच्या अनंत क्रिडा मंदिर आंतर सभागृहात पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असता कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देवनाथ, उद्घाटक म्हणून ॲड. प्रशांत देशपांड प्रमुख अतिथी डॉ. गोविदभाऊ कासट, प्रा. अशोक गोरखल. डॉ. सुरेशराव

सावदकर, मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ता श्री. हिम्मतराव धोम, जिल्हा सामान्य रुग्णालयाचे शल्य चिकित्सक डॉ. श्यामसुंदर निकम, डॉ. जाधव, रक्तदान समितीचे उपाध्यक्ष श्री. अजय दातेराव, मंडळाच्या सचिव डॉ. माधुरीताई चंडके यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद विद्यार्थी विद्यार्थी तथा रा.से.यो. स्वयंसेवकांनी उत्स्फुर्तपणे सहभागी होऊन १७५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. जयंत इंगोले यांना केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. विजय पांडे यांनी केले. कार्यक्रमाकरीता रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज तायडे व प्रा. आशिष हटेकर यांनी महत्वपूर्ण योगदान दिले.

**डेंग्यू रोगाला प्रतिबंध करण्या करीता डेंग्यू रॅली जनजागृती अभियान**



दि. ६ सप्टेंबर २०१८ रोजी डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन व अमरावती महानगर पालिका कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना पत्रकाव्दार दुरच्या रोगापासून बचावाकरीता डेंग्यू रोगाला आळा घालण्यासाठी जनजागृती अभियान रेलो च आयोजन करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी अमरावती महानगर पालिकेचे नगरसेवक श्री. अजय सारसकर श्री प्रणीत सानी आणि नगरसेविका सौ. लविना हर्ष. सौ. कुळकर्णी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देवनाथ, प्रा. डॉ. संजय तिरथकर, प्रा. अजय चेंडके, प्रा. दिपा कान्हेगावकर, प्रा. डॉ. महेन्द्र लोणकर, डॉ. श्रीकांत पाटील, एन.एस.एस कार्यक्रम अधिकारी प्रा. आशिष हटेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत रॅली काढण्यात आली. रॅलीची सुरुवात डि.सी.पी.ई. च्या इमारती समोरील प्रांगणातून माधवनगर, देशपांडे वाडी, प्रभात कॉलनी, कोल्हटकर कॉलनी, गणेश कॉलनी. रविनगर चौक, भुतेश्वर चोक, गोरक्षण चौक व परत महाविद्यालय परिसरामध्ये समारोप घेण्यात आला. रैलीदरम्यान प्रत्येक परिसरातील घरांमध्ये डेंग्यू रोगापासून सुरक्षा संबंधी माहिती पत्रक वाटण्यात आले. यामध्ये महाविद्यालय रा. से.यो. स्वयंसेवक तसेच महाविद्यालयातील बी. बी. ए. बी. सी.ए., बी.एस.सी. तसेच आर्युवेदीक महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थ्याचा मोठ्या संख्येने सहभाग होता.

**वृक्षारोपण कार्यक्रम**



दि. ५ सप्टेंबर २०१८ रोजी डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्यूकेशन राष्ट्रीय सेवा योजना पथक व योग विभागाद्वारे महाविद्यालयाच्या परिसरात शिक्षकदिनाचे अवचित्य साधून वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देवनाथ, प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. वनिता काळे, शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती, डी.सी.पी. इ. चे माजी प्राचार्य डॉ. विकास कोळेश्वर, रा.से.यी चे कोषाध्यक्ष डॉ. सुरेशराव देशपांडे, प्रा. जयंत गोडसे, डॉ. सूर्यकांत पाटील या मान्यवरांच्या उपस्थितीत घेण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयीन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले व नंतर रा.से.यो. स्वयंसेवक व महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्या माध्यमातून महाविद्यालयीन परिसरामध्ये ५० रोपट्यांचे वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी योगा विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. सुनिल लावडे, डॉ. प्रविण अनासाने. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज तायडे, प्रा. आशिष हटेकर व प्रा. संतोष इंगोले यांचे सहकार्य लाभले.

**रक्तगट तपासणी शिबीर**



दि. ३ सप्टेंबर २०१८ रोजी महाविद्यालयामध्ये प्रथमतः प्रवेशित झालेल्या बी.पी.ई.एस व बी. पी. एड प्रथम वर्ष विद्यार्थी बरा से.यो पथकामध्ये सहभागी झालेल्या स्वयंसेवकाना रक्तगटाबद्दल माहिती. व्हावी व रक्तदान सेवा कार्यामध्ये सहभाग घेता यावा या उद्देशाने गणेशदास राठी महाविद्यालय, अमरावती येथील डॉ. घनश्याम बाहेती व त्यांच्या चमूच्या नेतृत्वात रक्तगट तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थी व रा.से.सा. पथकामध्ये सहभागी स्वयंसेवक यांनी सहभागी होऊन जवळपास २४५ जणांनी रक्तगट तपासणी करून घेतली व रक्तगटाबद्दल माहिती जाणून घेतली.

**शहिदांच्या स्मृतीप्रित्यर्थ रक्तदान**



दि. १४ ऑगस्ट २०१८ रोजी डि.सी.पी.ई. च्या रा.से.या पथकाद्वारे व हिंदी महासंघाच्या वतीने शहीदांच्या स्मृतिप्रित्यर्थ रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असता कार्यक्रमाकरीता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देवनाथ वरिष्ठ प्रा. डॉ. टॉमी जोश. प्रा. डॉ. संजय तिरथकर व एन.सी.सी. विभागाचे प्रमुख प्रा. लेफ्टनंट देवानंद सावरकर, हिंदी महासंघाचे श्री. राजेंद्र पारेख, श्री. घनश्याम वर्मा. मंडळाच्या सचिव डॉ. माधुरीताई चंडके, रा.से.यो कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज तायडे, प्रा. आशिष हटेकर यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थी

तथा श्री. हव्या.प्र. मंडळाचे पोलीस प्रशिक्षणार्थी व कर्मचारी यांनी सहभागी होऊन जवळपास २५ जणांनी रक्तदान केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता प्रा. राजेश पांड, प्रा. सुनिल पिपळे, श्री. प्रशांत चौधरी यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले.

## आव्हान चान्सलर्स ब्रिगेड-२०१८ आपत्ती व्यवस्थापन राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबीरात सहभाग

दि. २५ मे ते ३ जून २०१८ दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे आयोजीत करण्यात आलेल्या आव्हान- २०१८ आपनी व्यवस्थापन राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबीरामध्ये महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक स्वप्नील रितपुरकर, गौरव भुजाडे यांनी सहभागी होऊन शिबीरामध्ये आग नियंत्रण पुरस्थिती नियंत्रण व व्यवस्थापन संकटकाळात करावयाची उपाययोजना, अपघात कालावधीत घ्यावयाची दक्षता व प्रथमोपचार आदीचे प्रशिक्षण प्राप्त करून यशस्वी सहभाग घेतला.

## सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धा पाणी फाऊन्डेशन द्वारा आयोजित जलयुक्त गाव उपक्रमामध्ये श्रमदान

दि. १९ मे २०१८ रोजी श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्यूकेशन द्वारे सत्यमेव जयते वॉटरकप स्पर्धा पाणी फाऊन्डेशन द्वारा राज्यातील सर्वच जिल्हा व तालुका पातळीवरील दुष्काळ परिस्थीतीवर मात करण्यासाठी नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील पिंपळगाव बनाई या गावाचा समावेश झाला असता त्या ठिकाणी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देवनाथ तसेच मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, मंडळाच्या सचिव डॉ. माधुरी चंडक यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज तायडे, प्रा. आशिष हटेकर, प्रा. संतोष इंगोले यांच्या नेतृत्वात ८० राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी उत्स्फुर्तपणे सहभागी होऊन पिंपळगाव बनाई येथे गावच्या सरपंच सौ. शरबू पंडीत, श्रमदान समितीचे अध्यक्ष श्री. अजय पंडित यांच्या माध्यमातून एक कि.मी. चा बांध तयार करून तब्बल एक कोटी लिटर पाण्याची बचत केल्या जाईल एवढा मोठा उपक्रम राबविण्यात आला असता महाश्रमदान केले. या मध्ये मंडळाच्या सि.डी. एफ विभागचे प्रमुख श्री. प्रशांत चौधरी, श्री. विजय इंगोले, श्री. धर्मेंद्र दवे, श्री. संजय खडसे, जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी श्री. नारायण सानप, खंडविकास अधिकारी, श्री. नंदकुमार धरणे, तहसिलदार मनोज लोणारकर, पाणी फाऊण्डेशनचे श्री. अतुल पाटील, सौ. सिमा नाकस यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले.

## आपत्ती व्यवस्थापन जिल्हानिहाय प्रशिक्षण व निवड चाचणी शिबीरात सहभाग

दि. २५ ते २६ एप्रिल-२०१८ दरम्यान विद्यार्थी भवन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे द्विदिवसीय प्रशिक्षण निवड चाचणी करीता महाविद्यालयातील दोन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक स्वप्नील रितपुरकर व गौरव भुजाडे यांना आपत्ती व्यवस्थापन शिवीरात सहभागी होण्याकरीता पाठविण्यात आले असता दोघांची निवड औरंगाबाद येथे होणा-या राज्यस्तरीय शिबीराकरीता करण्यात आली.

PRINCIPAL
Degree College of Physical Education
AMRAVATI (M. S.)